*पी.डब्ल्यु.डी.व्ही.ए.क्र.५९/ २०२२*

*अंजली वि. परमेश्वर*

*नि.क्र. १८ खाली*

**अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा पुढील उलटतपास गैरअर्जदारतर्फे विधीज्ञ श्री.पी.डी.निवारे यांचेद्वारे शपथेवर पुन्हा सुरु –**

आता मला नि.क्र.३७ च्या यादी खाली गैरअर्जदाराने दाखल केलेले फोटो दाखवले. त्या फोटोमध्ये शाळेचे नाव आहे. त्या फोटोमध्ये मी व माझे सहकारी यांचे छायाचित्र आहे. गोल्डन रॉक्स इंग्लीश स्कुल मध्ये मी सहाय्यक शिक्षीका म्हणुन कार्यरत आहे. त्यास **वस्तु क्र. ए ते डी** देण्यात येते. तसेच मला पगार सुध्दा मिळतो.

हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदार याला मला त्याच्याशी संसार करायचा नाही म्हणुन नोटीस पाठवली होती. माझा भाऊ शिक्षण घेत आहे व तो सध्या एम एस्सी दुसऱ्या वर्षाला आहे.

प्रश्न– तुमचा भवानी नगर पैठण येथे मोठा बंगला आहे ?

उत्तर – माझ्या वडीलांचे चार खोल्यांचे घर आहे.

माझ्या वडीलांकडे चार चाकी वाहन सुध्दा आहे. माझ्या सासरच्या आर्थीक परिस्थीतीपेक्षा माझ्या माहेरची आर्थीक परिस्थीती चांगली व सुदृढ आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझी गैरअर्जदारासोबत रहायची इच्छा नसल्यामुळे मी पुण्यावरुन पैठण येथे आले होते. माझ्यामध्ये व गैरअर्जदारामध्ये पी.डब्ल्यु.डी.व्ही.ए.क्र.१५/२०२२ मध्ये तडजोड झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, तरीसुध्दा मी ठरल्याप्रमाणे गैरअर्जदाराकडे नांदायला गेले नाही. ते या प्रकरणी दाखल आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला गैरअर्जदार क्र. १ व इतरांनी कधीही मारहाण केली नाही तसेच अपमानास्पद बोलले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदार क्र. २ व ३ यांच्यासोबत कधीही एकत्र नायगाव येथे नांदले नाही. मी गैरअर्जदाराने मला त्रास दिल्याबाबत नायगाव किंवा केज या तालुक्याच्या ठिकाणी त्यांच्याविरुध्द तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला गैरअर्जदारांनी कोणत्याही प्रकारे त्रास दिला नसल्यामुळेच मी त्यांचेविरुध्द त्या ठिकाणी कोणत्याही तक्रारी दाखल केल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यामध्ये व गैरअर्जदारामध्ये तडजोड होऊनसुध्दा माझे मामा वकील असल्यामुळे मी गैरअर्जदाराकडे नांदायला गेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदारांनी मला कधीही वाहन घेण्यासाठी तसेच इतर कारणासाठी पैशांची मागणी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदारांना त्रास

देण्यासाठी सदरील खोटी तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार व त्यांच्या आईवडीलांनी मला नांदायला नेण्याकरिता माझ्या गावी येऊन प्रयत्न केला असतांना सुध्दा मी व माझ्या आईवडीलांनी त्यांना अपमानास्पद वागणुक दिली होती व शिवीगाळ करुन बाहेर हाकलून दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या अंगावर असलेले सर्व स्त्रीधन मी गैरअर्जदाराचे घर सोडतांना सोबत घेऊन आले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील मजकूर माझ्या वकीलांनी लिहिला होता व त्याबद्दल माहिती न करुन घेता मी त्यावर सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला गैरअर्जदारांनी कोणताही त्रास दिला नव्हता व केवळ मला गैरअर्जदारासोबत रहायचे नसल्यामुळे व गैरअर्जदारांना त्रास देण्याच्या उद्देशाने मी वारंवार अशा प्रकारचे अर्ज दाखल करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी शाळेत नोकरी करत असल्यामुळे व योग्य तो पगार मिळत असल्याने मला पोटगीची कोणतीही आवश्कता नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by GANESH VASANTAPPA GANDHE
Date: 2025.11.27 15:39:57 +0530

दि. २७/११/२०२५

(जी.व्ही.गांधे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
कोर्ट क्र.१, पैठण